तुर्तातुर्त ताकीद आदेश (१) नियमीत दिवाणी दावा क्रमांक **४९/२०१६**
**नि.क्र.३१/(ड)** मोहम्मद कुरेशी वि. सतीश भगत + ०३

सी.एन्.आर.क्रमांक:एम्.एच्.आर.जी.०९०००४७१२०१६

अर्ज दाखल तारीख : **०५.१०.२०१७**

निकाल तारीख : **१०.०४.२०१८**

कालावधी : **०६** महिने, **०५** दिवस.

**<u>आदेश तुर्तातुर्त ताकीद अर्ज निशाणी क्रमांक ३१ वर</u>**

(पारीत केल्याचा दिनांक **१० माहे एप्रिल, २०१८**)

**०१)** प्रस्तुत अर्ज वादीने शपथपत्रावर ***<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ३९ नियम ०१ व ०२</u>*** नुसार दाव्याचा अंतीम निकाल होईपर्यत प्रतिवादींनी **वाद मिळकत** (मौजे वरसे, तालुका रोहा येथील गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०९, क्षेत्र २६ गुंठे म्हणजेच गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०१, क्षेत्र २६ गुंठे) कोणालाही विक्री, हस्तांतर करु नये किंवा त्यामध्ये त्रयस्थांचे हक्क निर्माण करु नये असा तुर्तातुर्त ताकीदीचा हुकुम होण्यासाठी दाखल केला आहे.

**<u>वादीने नमुद केलेली वस्तुस्थिती खालीलप्रमाणे</u>** :-

**०२)** वादीने श्रीमती शांता वामन भावे व चंद्रकांत वामन भावे यांच्याकडून वाद मिळकत दिनांक ०४.०६.१९९१ रोजी खरेदीखत दस्त क्रमांक **१०५३/१९९१** नुसार विकत घेतली आहे. प्रतिवादी क्रमांक ०१ सोबत प्रतिवादी क्रमांक ०२ ते ०४ यांनी दिनांक **०८.०६.२००९** रोजी त्यांच्याकडे वाद मिळकतीखेरीज अन्य मिळकत नसताना वाद मिळकतीबाबत दस्त क्रमांक **१७०८/२००९** नोंद केल्याचे वादीला माहे एप्रिल, २०१६ मध्ये माहित झाले.

**०३)** प्रतिवादी क्रमांक ०२ ते ०४ यांनी वाद मिळकतीबाबत जाणीवपुर्वक खोटे खरेदीदस्त प्रतिवादी क्रमांक ०१ च्या हक्कात नोंद केले आहे. वादीच्या खरेदीखतात वाद मिळकतीचा गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०९ असे नमुद असले तरी वाद मिळकतीचा गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०१ आहे. म्हणून वादीने प्रतिवादींनी वाद मिळकत कोणालाही विक्री, हस्तांतर करु नये किंवा त्यामध्ये त्रयस्थांचे हक्क निर्माण करु नये असा तुर्तातुर्त ताकीदीचा हुकुम देण्याची विनंती केली.

**०४)** प्रतिवादी क्रमांक ०१ विरुद्ध **'म्हणणे नाही'** असा आदेश पारीत केला. प्रतिवादी क्रमांक ०३ व ०४ ने म्हणणे **नि.क.३५** दाखल केले. प्रतिवादींनी अर्जातील विरुद्ध कथने नाकारली. प्रतिवादी क्रमांक ०३ व ०४ यांनी प्रतिवादी क्रमांक ०१ ला खरेदीखताने सन, २००९ मध्ये गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०१ ही मिळकत विकली आहे. वादीला चंद्रकांत भावे व शांता भावे यांनी गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०९ विक्री केली आहे. वादीचे अपिल उपविभागीय अधिका-यांनी फेटाळले आहे. म्हणून वादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**०५)** वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. किलबर्ट मोहनदास, प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. एम्. एन्. शिंदे व सौ. एम्. एन्. मनोहर यांचा युक्तीवाद ऐकला.

**०६)** दोन्ही पक्षांचे कथन व युक्तीवादाचे आणि उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील मुद्दे अर्जाच्या निर्णयासाठी उपस्थित झाले. मी त्या मुद्यांना खालीलप्रमाणे त्यापुढे निष्कर्ष नोंदवतो.

| अ.क. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश मिळण्यासाठी सकृतदर्शनी दावा त्याच्या बाजूने आहे असे सिद्ध करतो काय? | **नकारार्थी** |
| ०२ | वादी न्यायाचा /सोयीचा समतोल त्याच्या बाजूने झुकत आहे असे सिद्ध करतो काय? | **नकारार्थी** |
| ०३ | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश न मिळाल्यास त्याचे पैशाच्या स्वरूपात कधीही न भरून येणारे नुकसान होईल असे सिद्ध करतो काय? | **नकारार्थी** |
| ०४ | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश मिळण्यास पात्र आहे काय? | **नकारार्थी** |
| ०५ | आदेश काय? | **अर्ज नामंजूर करण्यात येतो.** |

## कारणमीमांसा

### मुद्दा क्रमांक ०१ बाबत :-

**०७)** वादीने खरेदीखत **नि.क.०४/२** नुसार शांता वामन भावे व चंद्रकांत वामन भावे यांच्याकडून दिनांक ०४.०६.१९९१ रोजी गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०९ ही मिळकत विकत घेतली आहे. प्रतिवादी क्रमांक ०१ ने खरेदीखत **नि.क.०४/३** नुसार गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०१ ही मिळकत प्रतिवादी क्रमांक ०२ ते ०४ कडून विकत घेतली आहे.

**०८)** वादीचे नाव सुची क्रमांक ०२ **नि.क्र.०४/४** मध्ये नमुद आहे, यावरुन खरेदीखताची नोंद दस्तऐवज नोंद सुचीमध्ये झाली आहे असा अर्थ निघतो. वादीने गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०९ या मिळकतीवर त्याचा ताबा खरेदीखतानुसार सन १९९१ पासून असल्याबाबत अधिकार अभिलेख पत्रक दाखल केले नाही. म्हणून वादीने खरेदी केलेल्या मिळकतीवर त्याचा ताबा आहे हे सिद्ध झाले नाही.

**०९)** मोजणी नकाशावरुन गट क्रमांक २२७ चे एकूण तीन भाग पडलेले दिसतात. वादीवर त्याने विकत घेतलेला गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०९ म्हणजेच प्रतिवादी क्रमांक ०१ ने विकत घेतलेला गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०१ आहे. वादीने गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०९ म्हणजेच गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०१ आहे हे सिद्ध करण्यासाठी कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. वादीने दिनांक ०४.०६.१९९१ रोजी गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०९ खरेदी केला असला तरी त्याचे नाव अधिकार अभिलेखपत्रकात आढळत नाही. वादीने त्याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही. किंबहुना वादीने अधिकार अभिलेखपत्रक दाखल केले नाहीत.

**१०)** वादीने सन १९९१ साली गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०९ ही मिळकत खरेदी करताना योग्य ती दक्षता घेतली नाही किंवा कायदेशीर शोध अहवाल घेतला नाही असा अर्थ निघतो. वादीने न्यायालयासमोर आणलेला वाद मुळात वाद मिळकतीच्या योग्य ओळखीबाबतचा आहे. वादीला त्याने खरेदी घेतलेल्या मिळकतीचा हिस्सा क्रमांक ०९ असताना आता २५ वर्षानंतर तो हिस्सा क्रमांक ०१ आहे असे म्हणणे संयुक्तीक नाही किंवा विलंबाचे आहे.

**११)** प्रतिवादी क्रमांक ०१ ने गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०१, ही मिळकत सन २००९ मध्ये खरेदीखताने विकत घेतली आहे. वादी त्याच्या हक्काबाबत सजग दिसून येत नाही. वादीने वाद मिळकतीच्या योग्य ओळखीबाबत किंवा वर्णनाबाबत खरेदीपासून सुमारे २५ वर्षानी दावा दाखल केला आहे. म्हणून वादी सकृतदर्शनी दावा त्याच्या बाजूने आहे हे सिद्ध करण्यास अयशस्वी झाला. म्हणून मी, मुद्दा क्रमांक ०१ ला नकारार्थी निष्कर्ष नोंदवतो.

**<u>मुद्दा क्रमांक ०२ बाबत</u>** :-

**१२)** प्रतिवादी क्रमांक ०१ ने गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०१ ही मिळकत सन २००९ मध्ये नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेतली आहे. म्हणून प्रतिवादी क्रमांक ०१ च्या हक्कावर कोणतेही बंधन लादता येणार नाही. म्हणून न्यायाचा / सोयीचा समतोल वादीच्या हक्कात नाही. म्हणून मी, मुद्दा क्रमांक ०२ ला नकारार्थी निष्कर्ष नोंदवतो.

**<u>मुद्दा क्रमांक ०३ बाबत</u>** :-

**१३)** प्रतिवादी क्रमांक ०१ गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०१ चा खरेदीखताने मालक आहे. म्हणून त्याच्याविरुद्ध मनाई आदेश दिल्यास त्याचे नुकसान होईल. वादीकडे गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०१ चा ताबा किंवा मालकी नाही. अद्याप गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०९ म्हणजेच गट क्रमांक २२७, हिस्सा क्रमांक ०१ आहे असा ठराव झालेला नाही. म्हणून वादीच्या हक्कात मनाई आदेश न दिल्यास त्याचे नुकसान संभवत नाही. म्हणून मी, मुद्दा क्रमांक ०३ ला नकारार्थी निष्कर्ष नोंदवतो.

**<u>मुद्दा क्रमांक ०४ बाबत</u>** :-

**१४)** वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश मिळण्यासाठी आवश्यक असलेले तिन्ही घटक सिद्ध करण्यात अयशस्वी झाला आहे. म्हणून मी मुद्दा क्रमांक ०४ ला नकारार्थी निष्कर्ष नोंदवतो. म्हणून मी, परिणामता मुद्दा क्रमांक ०५ ला उत्तर देण्यासाठी खालील आदेश पारीत करणे न्यायाचे समजतो.

**<u>आ दे श</u>**

**०१**. अर्ज **<u>नि.क.३१</u>** खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष लक्ष्मण फुले)**
**(एम एच आर जी ०००९ - २१२५)**
**स्थळ : रोहा.** **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रोहा.**
**दिनांक : १०.०४.२०१८.** **जिल्हा रायगड.**